## <u>शासनाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावयाची माहिती</u>

## राजशिष्टाचार, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

<u>सेवानिवृत्त अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत.</u>

**<u>विभागाची आवश्यकता:</u>**

राजशिष्टाचार विभागाच्या अधिपत्याखाली असलेल्या विमानतळ नियंत्रण कक्ष येथे तरोच सेवा व आस्थापनाविषयक बाबींचे व राजशिष्टाचार शाखेतील इतर संकीर्ण कामकाज करुन घेण्याकरीता व अन्य विषयांच्या अनुषंगाने प्रशासकीय स्वरुपाचा सल्ला देण्यासाठी राजशिष्टाचार विषयक बाबींचे सखोल ज्ञान असलेल्या शासनाच्या सेवेतून सेवानिवृत्त झालेल्या खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे अधिकाऱ्यांची राजशिष्टाचार शाखा, सामान्य प्रशासन विभाग येथे सल्लागार म्हणून एक वर्षाकरीता करार पध्दतीने नियुक्ती करावयाची आहे.

| अ.क्र. | सेवानिवृत्त अधिकारी/ कर्मचारी | आवश्यक अर्हता | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १. | अवर सचिव पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी | राज्य शासनाच्या सेवेतील अवर सचिव पदवरील विशेष राजशिष्टाचार अधिकारी (विमानतळ) म्हणून कमीत कमी ५ वर्ष हाताळलेले सेवानिवृत्त अधिकारी | १ |
| २. | कक्ष अधिकारी पदावरुन सेवानिवृत्त झालेले अधिकारी | राज्य शासनाच्या सेवेत कक्ष अधिकारी पदावरील सेवा व आस्थापनाविषयक बाबींचे व राजशिष्टाचार शाखेतील इतर संकीर्ण कामकाज करुन घेण्याकरीता राजशिष्टाचार विषयक कामकाज कमीत कमी ३ वर्ष हाताळलेले सेवानिवृत्त अधिकारी | १ |

अटी व शर्ती :-

१) सदर नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार जास्तीत जास्त एक वर्षासाठी करण्यात येणार असून त्याबाबतचे आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून एक वर्ष कालावधीसाठी ही नियुक्ती राहील.

२) विभागास आवश्यकता असलेली अर्हता धारण करणाऱ्या वय वर्षे ६५ च्या आतील सेवानिवृत्त झालेल्या अधिका-यांना प्राधान्य देण्यात येईल.

३) उमेदवारास मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असावे.

४) आवश्यक अर्हता धारण करणा-या इच्छुक सेवानिवृत्त अधिका-यांनी सदर पदाकरीता अर्ज विहित नमुन्यात को-या कागदावर सुवाच्च अक्षरात लिहावा अथवा टंकलिखित करावा.

५) आवश्यक अर्हता धारण करणा-या उमेदवाराने सदर पदाकरीता अर्ज दिनांक ०१.१२.२०२१ पर्यंत उप सचिव (राजशिष्टाचार), ३ रा मजला,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२. या पत्त्यावर पोहोचतील अशा रितीने टपालाने अथवा व्यक्तीशः आणून द्यावा. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२२-२२०२३३६१ या दूरध्वनीवर संपर्क साधावा. विहीत दिनांकानंतर प्राप्त झालेल्या अर्जावर कार्यवाही करण्यात येणार नाही तसेच या संदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेण्यात येणार नाही.

६) विभागास आवश्यक असलेली अर्हता व अनुभव नसलेल्या अधिका-यांनी अर्ज सादर केल्यास अशा अर्जावर विचार करण्यात येणार नाही. तसेच अशा अर्जांना उत्तर देण्यात येणार नाही.

७) मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येईल व त्याबाबतची नामिकासूची (पॅनेल) तयार केली जाईल. या सूचीतील योग्य उमेदवार निवडीबाबतचा संपूर्ण अधिकार विभागाचा राहील.

८) करार पध्दतीने नियुक्त सेवानिवृत्त अधिकाऱ्यांस राजशिष्टाचार उप विभाग, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई येथे काम करावे लागेल. तसेच विभागाच्या आवश्यकतेनुसार प्रसंगानुरुप अन्य ठिकाणी देखील कामकाज हाताळावे लागेल.

९) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या अधिका-यांनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील. कराराच्या कालावधीत सेवानिवृत्त अधिकारी हे प्रधान सचिव व मुख्य राजशिष्टाचार अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली काम करतील.

१०) सदर नियुक्तीच्या अनुषंगाने पारिश्रामिक व भत्ते आणि इतर अटी व शर्ती सामान्य प्रशासन विभागाच्या क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३ दिनांक १७ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे राहतील.

(अशोक साळवे)
उप सचिव, राजशिष्टाचार
सामान्य प्रशासन विभाग, ३ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.

## अर्जाचा नमुना

सेवानिवृत्त राज्य शासकीय अधिकारी यांची करार पध्दतीने नियुक्ती करण्याकरीता अर्ज.

| उमेदवाराने अलीकडील काळातील स्वत:चे छायाचित्र येथे चिकटवावे. |
|---|

१)अर्जदाराचे संपूर्ण नाव : ..............................................................

२)अर्जदाराचा पत्ता : .. ..............................................................

३)सेवानिवृत्तीच्या वेळेचे पदनाम : ..............................................................

४) भ्रमणध्वनी क्रमांक : ..............................................................

५) जन्म दिनांक व वय : ..............................................................

६) विभागास आवश्यक अर्हता अर्जदाराकडे आहे काय ? होय/नाही

७) अनुभव : ..............................................................

विवक्षित प्रकारचे कामकाज पार पाडण्यासाठी करार पध्दतीने नियुक्तीने जाहिरात / सूचना मी काळजीपूर्वक वाचली असून सदर सूचनेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

ठिकाण:

दिनांक:-

अर्जदाराची स्वाक्षरी